नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०९/२०२६ (शनिवार)**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयात लोकअदालत मध्ये २०१५ प्रकरणे निकाली तर २७,८१,८०० रूपायांचा दंड वसुल

**नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत दिनांक १२/०९/२०२६ रोजी आयोजीत महालोकअदालत यशस्वी रित्या पार पडली. नमुद लोकअदालत मध्ये खालील प्रमाणे प्रकरणे निकाली काढण्यात आली.**

**नागपुर उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** २५८ प्रकरणे निकाली काढून एकूण २,३२,९००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. **काटोल उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** ४०६ प्रकरणे निकाली काढून एकूण ८५,७००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.**उमरेड उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** एकुण ३२० प्रकरणे निकाली काढून एकूण ६,४७,४००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.**रामटेक उपविभागातील** सर्व पोलीस स्टेशन मधील एकूण ५२४ प्रकरणे निकाली काढून एकूण ७,४६,४००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. **कन्हान उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन** मधील एकूण १९६ प्रकरणे निकाली काढून एकूण ४७११००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. **सावनेर उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** एकूण ३११ प्रकरणे निकाली काढून एकूण ५,९८,३००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**वरप्रमाणे कलम २८५ भा.न्या.सं अन्वये (सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा किंवा धोकादायक रित्या वाहन उभे करणे ) मदयपान करून वाहन चालविणे ड्रंक ॲड ड्राईव्ह च्या कलम १८५, जुगार, महाराष्ट्र पोलीस कायदा, तसेच इतर प्रकरणे असे एकुण २०१५ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहे.तसेच २७,८१,८००/— रूपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे.**

# आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांचा रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक १२/०९/२०२६ रोजी आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणत्याही अनुचित परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्याच्या दृष्टीने नागपूर ग्रामीण जिल्हयात पोलीस स्टेशन मोहपा च्या हद्दीत रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम घेण्यात आली.

पोलीस निरीक्षक श्री ईश्वर हनवते, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मोहपा यांच्यासह मोहपा पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक आणि होमगार्ड यांनी मोहपा शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला. यावेळी पोलीस अधिकारी व अंमलदार ढाल, लाठी, हेल्मेट इत्यादी दंगा नियंत्रण साहित्याने सज्ज होऊन दंगा नियंत्रणाचा सराव करण्यात सहभागी झाले. तसेच पोलीस दलाची सज्जता, जलद प्रतिसाद क्षमता, पथकांमधील समन्वय तसेच उपलब्ध दंगा नियंत्रण साहित्याच्या हाताळणीचा सराव करण्यात आला.




POLICE
POLICE
POLICE
POLICE
POLICE
POLICE
MENS WEAR

# पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत खुन करणाऱ्या आरोपीतांना तात्काळ अटक

**पोलीस स्टेशन पारशिवनी :—** दिनांक ११/०९/२०२६ रोजी फिर्यादी श्री. अजय राजु तांडेकर, वय २६ वर्ष, रा. वार्ड नं ०२, डोरली तह. पारशिवनी, जि. नागपुर यांनी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे तक्रार दिली की, दिनांक ११/०९/२०२६ रोजी आरोपी क्र. १) आलोक प्रमोद गजभिये,वय २१ वर्षे, २) आदित्य केशवराव देशपांडे, वय २० वर्षे ३) विशाल मारोतीराव वाघमारे, वय १९ वर्षे, आणि ४) विधीसंघर्ष बालक सर्व रा. डोरली यांनी फिर्यादीचे वडील मृतक नामे राजु भोलासिंग तांडेकर, वय ५६ वर्ष, रा. डोरली यास मोबाईल चोरता का असे म्हणून फिर्यादीचा वडीलास लाकडी काठीने व पट्टयाने मारून जख्मी केले. त्यानंतर फिर्यादीस घटनेची माहिती मिळताच फिर्यादीने वडीलास प्राथमिक आरोग्य केंद्र डोरली येथे उपचार कामी नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन फिर्यादीचे वडीलास मृत घोषित केले. यातील आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे वडीलास मारहाण करून फिर्यादीचे वडील मृतक राजु भोलासिंग तांडेकर, वय ५६ वर्ष यांचा खुन केला.

**पोलीसांनी सदर प्रकरणात कलम १०३(१), ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करून पारशिवणी पोलीसांनी तात्काळा आरोपीतांना दिनांक ११/०९/२०२६ रोजी अटक केली.**

# अनोळखी इसमाचा मृतदेह ओळख पटविणेबाबत

**पोलीस स्टेशन नरखेड :— दिनांक ११/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत सिंगारखेडा शिवारातील रेल्वे पटरीलगत एक अनोळखी इसम मृत अवस्थेत पडून असल्याची माहिती प्राप्त झाली.सदर माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. प्रथमदर्शनी सदर इसम रेल्वेगाडीतून खाली पडल्यामुळे मृत्यू झाला असावा असे दिसून येत आहे.सदर प्रकरणी पोलीस स्टेशन नरखेड येथे मर्ग नोंद करण्यात आला आहे.**

**मयत अनोळखी इसमाचे वर्णन :— वय अंदाजे २९ ते ३३ वर्षे. अंगात पांढऱ्या रंगाचा टी—शर्ट व काळ्या रंगाची ट्रॅक पँट परिधान केलेली आहे.उजव्या हाताच्या मनगटावर मराठीत “पुष्पेंद्र” ,तर डाव्या हातावर इंग्रजीत “PUSKAR ” गोंदविलेले (टॅटू) आहे.रंग सावळा, उंची अंदाजे ५ फूट, मध्यम बांधा असून दाढी व मिशी आहेत.**

**सदर मयत इसमाची ओळख पटविण्याचे तसेच त्याच्या नातेवाईकांचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. सदर वर्णनाच्या इसमाबाबत कोणास काही माहिती असल्यास त्यांनी तात्काळ खालील दिलेल्या क्रमांकवार संपर्क साधावा.**

**संपर्क क्रमांक:—**

१. सपोनि मंगला मोकाशे, प्रभारी अधिकारी पोस्टे नरखेड —८३८०८५०३५०
२.पोउपनि सुरेखा बिडगर, पोलीस स्टेशन नरखेड—९८२२४१५०३८
३.नियंत्रण कक्ष नागपुर ग्रामीण जिल्हा —७०६६११२१००





## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०६ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ३ लाख ९३ हजार ८२० रूपयाचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— दिनांक ११/०९/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गुप्त बामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, पाचगाव तलाव जवळील मोकळया जागेत सार्वजनिक ठिकाणी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. पोलीसांनी तात्काळ कारवाई

करत घटनास्थळी धाड टाकली असता **आरोपी नामे १) प्रकाश शंभुजी साहु, वय २८ वर्ष २) निखील विश्वजीत थुल, वय २९ वर्ष, ३) रोहण संजय खडसे, वय २४ वर्ष ४) राहुल गौतम धवणे, वय ३३ वर्ष ५) संकुल सुनिल थुल, वय २४ वर्ष ६) रितेष हरीप्रकाष हटवार, सर्व रा. पाचगाव, ता. उमरेड, जि. नागपूर** हे जागीच जुगार खेळतांना मिळुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते, एकुण रोख रक्कम ३८२०/—रुपये, १ मोबाईल ०६ मोटरसायकल असा एकुण ३,९३,८२०/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. नमुद प्रकरणी वरील आरोपी यांच्या विरुद्ध कलम १२ अ म.जू.का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**



**अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.**
**३ लाख ११ हजारांचा मुद्देमाल जप्त**
**जलालखेडा पोलीसांची कामगिरी**

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक ११/०९/२०२६ रोजी जलालखेडा पोलीसांना गुप्तबामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा दावसा ते साखरखेडा जाणा—या रोडचे बाजूला झाडाखाली सार्वजनिक ठिकाणी काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे.

पोलीसांनी तात्काळ कारवाई करत घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे **१) अरमानसिंग मानसिंग टाक, वय ३४ वर्ष, रा. बानोरचंद्र, ता. नरखेड, २) पवन राजपूत जूडपे, वय २९ वर्ष, रा. पिंपळधरा, ता. नरखेड,३) मनोज दिवाकर टेकाम, वय ३२ वर्ष, रा. दावसा, ता. नरखेड,४) संजय ज्ञानेश्वर पाटील, वय ३३ वर्ष, रा. पिंपळधरा ,ता. नरखेड,५) अविन लक्ष्मणराव सहारे, वय ३२ वर्ष, रा. पिंपळधरा, ता. नरखेड,६) सतवनसिंग मनोहरसिंग बावरी, वय ३८ वर्ष, रा. बानोरचंद्र शिखबेडा. ता. नरखेड. जि. नागपूर** हे जागीच जुगार खेळतांना मिळुन आले.

**पोलीसांनी पंचाासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते, एकुण रोख रक्कम १३४५/—रुपये, ५ मोटर सायकल आणि इतर साहीत्य असा एकुण ३,११,३९५/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. नमुद प्रकरणी वरील आरोपी यांच्या विरुद्ध कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**



## अवैध जुगाराविरोधात नागपूर ग्रामीण पोलिसांची विशेष मोहीम; १२२ आरोपींवर २३ गुन्हे दाखल

## १६ मोबाईल व ११ दुचाकींसह ८ लाख ८२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण जिल्ह्यात अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या तसेच जुगार खेळविणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने दिनांक ११/०९/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण पोलिसांनी जिल्हाभर विशेष मोहीम राबविली. या विशेष मोहिमेदरम्यान विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या १२२ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकूण २३ गुन्हे दाखल करण्यात आले.**

**पोलीस स्टेशन उमरेड** येथे ४ आरोपीविरूध्द १ गुन्हा नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्याचे वर **१ गुन्हा नोंद** करण्यात आला आहे. **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे ८ आरोपीविरूध्द १ गुन्हा आणि ५ आरोपीविरूध्द १ गुन्हा, नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **२ गुन्हे नोंद** आहे. **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे ५ आरोपीविरूध्द १ गुन्हा, नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद करण्यात आला आहे. **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे ६ आरोपीविरूध्द १ गुन्हा आणि ५ आरोपीविरूध्द १ गुन्हा नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **२ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन कुही** येथे ४ आरोपीविरूध्द १ गुन्हा आणि ३ आरोपीविरूध्द १ गुन्हा नमुद हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **२ गुन्हे** नोंद आहे. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०१ आरोपी हा अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे ६ आरोपीविरूध्द १ गुन्हा, नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन अरोली** येथे ५ आरोपीविरूध्द १ गुन्हा, आणि ७ आरोपीविरूध्द १ गुन्हा, आणि ६ आरोपीविरूध्द १ गुन्हा, नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **३ गुन्हे** नोंद आहे. **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे ४ आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे ०३ आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन बोरी** येथे ०४ आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन

आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे ०६ आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल** येथे ०४ आरोपीविरूध्द १ गुन्हा, नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे ०५ आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे १५ आरोपीविरूध्द १ गुन्हा आणि ५ आरोपीविरूध्द १ गुन्हा नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर २ **गुन्हे** नोंद आहे. **पोलीस स्टेशन मौदा** येथे ०३ आरोपीविरूध्द १ गुन्हा आणि ५ आरोपीविरूध्द १ गुन्हा, नमुद हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **२ गुन्हे** नोंद आहे.

**वर प्रमाणे १२२ आरोपीविरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण २३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ५२ ताशपत्ते, १६ मोबाईल, ११ दुचाकी वाहनांसह एकुण एकुण ८,८२,४८२/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

## नागपूर ग्रामीण पोलीसांची अवैध दारूविरोधात विशेष मोहीम; ४७ गुन्हे दाखल

**दिनांक ११/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करण्याच्या अनुषंगाने दिनांक ११/०९/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण पोलिसांनी जिल्हाभर विशेष मोहीम राबवून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ४७ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन अरोली** येथे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे ०३ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत ०४** गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत ०२** गुन्हे नोंद,**पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत ०८** गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत** ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत** ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत** ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव अंतर्गत ०१** गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन कुही अंतर्गत**

०२ गुन्हे नोंद . **पोलीस स्टेशन वेलतूर अंतर्गत** ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत ०१** गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत ०१** गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा अंतर्गत ०३** गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत** ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत ०३** गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत** ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत ०१** गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण ५२०२० मिली देशी दारू, ४८६० मिली विदेशी दारू, ३४४ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ६४,२५३/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ११/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०३ आरोपी यांचेवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. **पोलीस स्टेशन जलालखेडा** अंतर्गत आरोपी सूरेश टिप्पू टेकाम, वय ५७ वर्ष, रा. सिंजर, ता. नरखेड, जि. नागपूर हा मौजा खरबडी येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोस्टे बोरी अंतर्गत** आरोपी रविसिंग रामसिंग ठाकूर, वय ५६ वर्ष, रा. वार्ड क्र. ०६, रेल्वे स्टेशन जवळ बुटीबोरी तालुका जिल्हा नागपूर हा एम आय डी सी रोड पुण्यनगरी प्रेस जवळ बुट्टीबोरी येथे २) रंजितसिंह रामसिंह ठाकुर, वय ५९ वर्ष, रा. वार्ड क्र. ०६, रेल्वे स्टेशन जवळ बुट्टीबोरी तालुका जिल्हा नागपूर हा एम आय डी सी रोड म्हाडा कॉलनी रोड, बुटीबोरी येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७०५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १२/०९/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७०५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३० आरोपी अशा एकुण ९१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे १७ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १३८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४९ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १५ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १६ आरोपी अशा एकुण १४८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २१ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १५ आरोपी अशा एकुण ७० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २५ आरोपी अशा एकुण ११३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४६ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४४ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २७ आरोपी अशा एकुण १४५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.




पोलीस स्टेशन
पारशिवनी
फोन नं. : ०७१०२-२२५१२३
SHIELD
IMPOSSIBLE


Levi's

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर